# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:८ ऑगस्ट, २०२२

---

जळगाव, दि. ८ (   ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी म्हणून सनदी लेखापाल रवींद्र पाटील यांनी सोमवार दि.८ ऑगस्ट रोजी पदभार स्वीकारला.

प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल यांच्याकडून त्यांनी हा पदभार स्वीकारला. उप वित्त अधिकारी असलेले श्री. गोहिल हे गेल्या १० महिन्यांपासून प्रभारी वित्त व लेखा अधिकारी म्हणून काम पाहत होते. पदभार घेतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार, उपकुलसचिव अनिल मनोरे आणि वित्त विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. रवींद्र पाटील यांची गेल्या आठवडयात मुलाखतीव्दारे वित्त व लेखा अधिकारी म्हणून निवड झाली. मूळचे जळगाव जिल्ह्यातील असेलेल्या श्री. पाटील यांना सनदी लेखापाल म्हणून १० वर्षांचा अनुभव आहे. विद्यापीठाचे ते तिसरे वित्त व लेखा अधिकारी आहेत.

## बातमी क्र.२

जळगाव, दि. ८ (   ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या चौथ्या नामविस्तार दिनानिमित्त गुरुवार, दि.११ ऑगस्ट रोजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.आर.एस.माळी उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी राहतील. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.विजय खोले व मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.आर.डी.कुलकर्णी उपस्थित राहतील. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे देखील यावेळी हजर राहणार असून या समारंभात विद्यापीठाच्या नूतन संकेतस्थळाचे लोकार्पण होणार आहे. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळाचे नूतनीकरण करण्यात आले असून दिव्यांग तसेच विद्यार्थी, कर्मचारी आणि भागधारक यांना हे संकेतस्थळ मोबाईल, डेस्कटॉप, अथवा टॅब या व्दारे देखील सहजपणे हाताळता येणार आहे. हे संकेतस्थळ संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस. आर. कोल्हे, प्रा.मनोज पाटील, पध्दती विश्लेषक दाऊदी हुसेन यांनी विकसित केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी